उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारितील अशासकीय अनुदानित समाजकार्य महाविद्यालयांतील पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी तासिका तत्त्वावर अध्यापकांच्या नेमणूका व मानधन अदायगीबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण -२०२६/ ई-१७०८२५६/विशि-१,
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक:- २०.११.२०२६

वाचा:-

१. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८/(१८५/१८१)/मशि-३, दि.१४.११.२०१८.
२. शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.१८१/२१/विशि-१, दि.१०.०८.२०२१.
३. शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.१८१/२१/विशि-१, दि.१७.१०.२०२२.
४. शासन निर्णय क्र.अर्थसं-२०२२/प्र.क्र.१०५/(१)/मशि-३, दि.२७.०३.२०२३.
५. शासन निर्णय क्र. सकाम-२०२३/प्र.क्र.९९/सामासू, दि.२९.०२.२०२४.
६. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/स.का.म/सीएचबी/ई-२७३२०५३/मवि-२, दि.२५.०३.२०२६ चे पत्र.

प्रस्तावना:-

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय दि.१७.१०.२०२२ अन्वये तासिका तत्त्वावरील अध्यापकांची नेमणूक, विद्यापीठ मान्यता, दरमहा मानधन अदायगी याबाबत सुसुत्रता आणून कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.

०२. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय दि.२९/०२/२०२४ अन्वये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अखत्यारीतील समाजकार्य महाविद्यालय (बीएसडब्ल्यू / एमएसडब्ल्यू अभ्यासक्रम) हा विषय उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे.

०३. त्यानुसार, तासिका तत्त्वावरील अध्यापकांची नेमणूक, विद्यापीठ मान्यता, दरमहा मानधन अदायगी याबाबतची शासन निर्णय दि.१७.१०.२०२२ अन्वये विहित केलेली कार्यपध्दती समाजकार्य महाविद्यालयांना लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय:-

तासिका तत्त्वावरील अध्यापकांची नेमणूक, विद्यापीठ मान्यता, दरमहा मानधन अदायगी याबाबत शासन निर्णय दि.१७.१०.२०२२ अन्वये विहित केलेली कार्यपध्दती उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारित येणाऱ्या समाजकार्य महाविद्यालयांना लागू करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

०२. सदर शासन निर्णय निर्गमित करताना नस्ती क्र. संकीर्ण-२०२६/ई-१७०८२५६/विशि-१ अन्वये सामान्य प्रशासन विभागाचे अभिप्राय घेण्यात आले आहेत.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६११२०१४३६०५०४०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRATAP PANDURANG LUBAL

Digitally signed by PRATAP PANDURANG LUBAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=b0d6763338fc6cc4f7cf07ca60db7abc1cfac99c84ab1b5bfc0dae4609d631d0, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AF6895C47A84066432F5BDD1F182B4163D880AC9BD8D24A198FD0E7310B8EB59, cn=PRATAP PANDURANG LUBAL
Date: 2026.11.20 14:37:16 +05'30'

(प्रताप पां. लुबाळ)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, लोकभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क व क्रिडा व युवा कल्याण) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय, मुंबई.
८. सर्व सह सचिव / उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०. सर्व विभागीय सहसंचालक, उच्चशिक्षण,
११. निवड नस्ती (विशि-१).